कि.फौ. अर्ज क्र.५९३/२०२५

नि.क्र.१

## व्हेरीफिकेशन शपथेवर सुरु

**नाव :- शायजु क्रिष्णन पिल्लई**

वय :- ४१ वर्षे, धंदा :- नोकरी,

रा. कासारवाडी, जि.पुणे.

१. माझे वडील क्रिष्णन पिल्लई हे आर्मीमधून निवृत्त झाले होते. माझे वडीलांना एप्रिल २०२४ मध्ये कॅन्सर झाला होता व मी व माझी पत्नी त्यांची काळजी घेत होतो व उपचार करत होतो. परंतु, त्यांचा कॅन्सर चौथ्या स्टेजला गेल्यामुळे डॉक्टरांनी त्यांना केवळ दोन महीने जगण्यासाठी वेळ आहे असे सांगितले. त्यावेळी ते हॉस्पीटलमध्ये दाखल होते. परंतु, डॉक्टरांनी त्यांना उपचार करुन घरी सोडल्यानंतर माझ्या व माझ्या पत्नीने केलेल्या सेवेमुळे त्यांची तब्येत सुधारली. त्यामुळे माझ्या वडीलांचे माझ्या पत्नी विषयी व माझ्या बद्दल जास्त आपुलकी निर्माण झाली व त्यांनी माझ्या पत्नीला त्यांच्या पैशातून थोडे सोन्याचे दागिने बनवून दिले. एकेदिवशी माझ्या बहिणीचा माझ्या वडीलांना फोन आला व त्यावेळी माझ्या बहिणीने काही कारणावरुन माझ्या वडीलांना माझ्या बद्दल गैरसमज निर्माण करुन दिला. त्यामुळे माझे वडील माझे घर सोडून त्यांच्या स्वतःच्या घरी ऑक्टोंबर २०२४ मध्ये देहुरोड येथे निघून गेले व तेथे ते तीन महीने एकटेच राहीले.

२. त्यानंतर दि.१३/०३/२०२५ रोजी माझे वडील माझ्या बहिणीच्या घरी गेले. दि.१५/०३/२०२५ रोजी माझे वडील तेथे दुपारी १२.०० वाजता बाथरुममध्ये गेले व तेथे ते पडले व बराच वेळ वाट पाहून बाहेर न आल्याने माझ्या बहिणीने व तिच्या पतीने बाथरुमममध्ये पाहीले असता माझे वडील तेथे बेशुध्द पडले होते. त्यामुळे त्यांनी माझ्या वडीलांना बाहेर काढले व त्यांना बेडवर बसवले. त्यावेळी त्यांचा बी.पी. वाढल्यामुळे त्यांना बोलता येत नव्हते तरी देखील माझी बहीण व दाजी त्यांना केवळ

हॉस्पीटलमध्ये घेवून जावू का असे विचारत व व्ही.डी.ओ. काढत होते. त्यानंतर ०४.०० ते ०५.०० वाजण्याच्या सुमारास त्यांनी माझ्या वडीलांना बिर्ला हॉस्पीटल, रावेत येथे उपचारासाठी घेवून गेले. त्यावेळी आर्मीच्या हॉस्पीटलमध्ये बेड उपलब्ध नसल्यामुळे त्यांनी सीमबॉयसीस हॉस्पीटलमध्ये फोन केला. त्यावेळी माझ्या वडीलांच्या आर्मीच्या कार्डवर त्यांना सदर हॉस्पीटलमध्ये बेड उपलब्ध असल्याचे कळाले. पंरतु, वडीलांची स्थिती लक्षात घेता हॉस्पीटलमधील लोकांनी त्यांच्यासोबत घरातील एक व्यक्ती पाहीजे असे सांगितले. त्यावेळी त्या दोघांना त्यांना कामाला जायचे कारण सांगून सदर हॉस्पीटलमध्ये जाण्यास तयारी दर्शवली नाही. त्यानंतर त्यांनी माझ्या वडीलांना गाडीमध्ये बसवून ठेवले व रात्री ०१.१० त्यांना गाडीमधून पवना हॉस्पीटलमध्ये दाखल केले.

३. माझ्या बहिणीने किंवा तिच्या पतीने मला सदर घटनेबाबत काहीही कळविले नाही. दुसऱ्यादिवशी सकाळी ०८.०० वाजता मला बहिणीने फोन करुन वडील व्हेन्टीलेटरवर असल्याचे सांगितले. त्यावेळी मी व माझी पत्नी सदर हॉस्पीटलमध्ये गेलो. त्यावेळी माझे वडील पवना हॉस्पीटलमध्ये जनरल वार्डमध्ये व्हेन्टीलेटरवर असल्याचे दिसले. त्यावेळी मी डॉक्टरांना वडीलांची स्थिती विचारण्याबाबत गेलो. त्यावेळी डॉक्टरांनी मला पेशंन्टला वेळेत दाखल न केल्याचे कारण सांगितले व दुपारी ०४.३० वाजता माझ्या वडीलांना डॉक्टरांनी मयत घोषित केले. तरी देखील माझी बहीण व तिचे पती हॉस्पीटलमध्ये आले नाही. त्यामुळे मी त्यांना फोन करुन वडील मयत झाल्याचे सांगितले. त्यावेळी त्यांनी मलाच वडील असे कसे वारले म्हणून विचारले व हॉस्पीटलमध्ये आल्यावर मी बहिणीला वडील कसे पडले असे विचारत असतांना बहीण माझ्या अंगावर धावून आली. त्यानंतर आम्ही वडीलांचे अंत्यसंस्कार केले. आम्ही देहुरोड येथील वडीलांच्या घरी पुढील रितीरिवाजासाठी काही दिवस गेलो.

४. माझे वडील आर्मीत असल्यामुळे तेथून मी चार दिवसांनी त्यांचे आर्मीचे ओळखपत्र व पेंन्शन पुस्तक देण्यासाठी देहुरोड येथे आर्मी कार्यालयामध्ये गेलो होतो.

त्यावेळी माझ्या बहिणीने माझ्या अनुपस्थित तिच्या पतीला घरातील वडीलांच्या कपाटामध्ये असणारे आई वडीलांचे सोने, दागिने तसेच, वडीलांचे पैसे, मोबाईल, वडीलांची ॲक्टीवा गाडी तिच्या पतीकडे तिच्या घरी पाठवून दिली. परंतु, सदर परिस्थितीमध्ये बहिणीशी वाद न घालता मी आमच्या घरी आलो व पुन्हा साधारण दोन महीन्यांनी मी बहिणीला देहुरोड येथील घराची चावी मागितली. परंतु, तिने चावी देण्यास नकार दिला. त्यामुळे माझा संशय वाढला व मला असे लक्षात आले की, माझ्या बहिणीने माझ्या आई वडीलांचे संपूर्ण सोने, पैसे, मोबाईल, गाडी व सर्व कागदपत्रे ही वडीलांच्या घरातून काढून घेतली व सदर बाब माझ्या बहिणीने व तिच्या पतीने संगनमताने केली. तसेच, त्या दोघांनी माझ्या वडीलांना वेळेत उपचार न केल्याने माझ्या वडीलांचा मृत्यू झाला. तसेच, वडीलांना उपचाराची गरज असतांना माझी बहीण व तिचे पती त्यांना उपचार न करता त्यांचा व्ही.डी.ओ. बनवत असल्याचे व हॉस्पीटलमध्ये नेवू का विचारत असल्याचे देखील निदर्शनास आले. त्यामुळे केवळ संपत्तीसाठी माझ्या वडीलांचा बहीण व तिच्या पतीने घातपात केल्याचे निदर्शनास आले.

५. त्यानंतर मी माझी बहीण व तिच्या पती विरुध्द देहरोड पोलिस स्टेशन येथे तक्रार देण्यासाठी गेलो असता पोलिसांनी तेथे गुन्हा नोंद करण्यास नकार दिला व बहीण रावेत पोलिस स्टेशनच्या हद्दीत राहत असल्यामुळे मला तेथे पाठवले. त्यानंतर रावेत पोलिस स्टेशन येथील पोलिसांनी देखील गुन्हा नोंद करुन घेण्यास नकार दिला. त्यामुळे मी पोलिस कमिशनर कार्यालय, चिंचवड येथे गेलो. त्यानंतर कमिशनर कार्यालयातून देहुरोड पोलिस स्टेशन येथे माझी तक्रार नोंद करण्यासाठी अर्ज पाठवला. त्यामुळे मी पुन्हा देहुरोड पोलिस स्टेशन आलो. त्यावेळी मला समजले की, माझा अर्ज देखील पोलिसांनी गहाळ केला व माझ्या बहिणीला व तिच्या पतीला पोलिस स्टेशनला बोलावून घेतले. त्यावेळी बहिणीने व तिच्या पतीने माझ्या वडीलांनी त्यांच्या घराचे मृत्यूपत्र तिच्या नावे केल्याचे सांगितले. परंतु, माझ्या वडीलांची परिस्थिती ही मृत्यूपत्रावर सही न करण्याची व मृत्यूपत्र करु न देण्याची होती. त्यांनतर संबंधीत पोलिस अधिकारी यांनी मला व माझ्या बहिणीला पोलिस स्टेशनमध्ये बोलावून सदर

गंभीर स्वरुपाच्या गुन्हयामध्ये तडजोड करण्याचा प्रयत्न केला परंतु, माझा गुन्हा दाखल करण्यास नकार दिला. त्यामुळे माझ्या बहिणीने व तिच्या पतीने संगनमताने वर नमुद सर्व मिळकत, पैसे, सोने हडप करण्याच्या उद्देशाने व माझ्या वडीलांच्या नावाचे बोगस मृत्यूपत्र करुन घेतल्याने, त्यांच्यावर वेळवर उपचार न केल्यामुळे त्यांच्या मृत्यूस कारणीभुत झाले. त्यामुळे माझी बहीण व तिच्या पती विरुध्द सदर तक्रार दाखल केली.

| |
|---|
| फिर्यादीची सही |
| Shyju |
| **शायजु क्रिष्णन पिल्लई** |

श्रवणोत्तर स्वीकृती

दि:२८/११/२०२५

**(श्रीमती किर्ती अ. देशपांडे)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
वडगांव मावळ, पुणे.